# ...अन् त्याला लाभले भाग्य नव्या दृष्टीचे

## बेळगावातील नेत्रतज्ज्ञांकडून आगळी वेगळी शस्त्रक्रिया

- डॉ. सिद्धार्थ पुजारी व सहकाऱ्यांचा प्रयोग
- दक्षिण भारतात प्रथमच
- दाढेत लेन्स बसवून दिली दृष्टी



गुरुराज कलाल



दाढेत बसविण्यात आलेले ऑप्टिकल सिलिंडर (लेन्स).



**बेळगाव : शस्त्रक्रियेबद्दल आभार मानताना गुरुराज कलाल व त्यांच्या पत्नी. समवेत डावीकडून डॉ. नितीन खोत, सुरेश पुजारी व डॉ. सिद्धार्थ पुजारी.**

▶ **बेळगाव / प्रतिनिधी**

चुकीच्या इंजेक्शन व उपचार पद्धतीमुळे दृष्टी गमावलेल्या रुग्णास नवी दृष्टी देण्याचे काम बेळगाव येथील डॉ. सिद्धार्थ पुजारी या नेत्रतज्ज्ञाने केले आहे. स्टीव्हन जॉन्सन सिंड्रोम (एसजेएस) या व्याधीने जीवनात अंधार पसरलेल्या रुग्णावर 'मोडीफाईड–ओस्टीओ–ओडोंटो–कॅरॅटो–प्रोस्थेसीस' ही शस्त्रक्रिया यशस्वी करून त्यांनी चमत्कार घडविला आहे. दक्षिण भारतात अशा प्रकारची शस्त्रक्रिया पहिल्यांदाच झाली आहे. सदर शस्त्रक्रिया बेळगावात झाली असल्याने यास विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

बैलहोंगल येथील गुरुराज कलाल (वय ३०) या तरुणावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. या शस्त्रक्रियेविषयी डॉ. पुजारी यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

कलाल याला आजारपणामुळे दहा वर्षांपूर्वी बैलहोंगल येथील एका दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तेथील डॉक्टराने त्याला चुकीचे इंजेक्शन दिल्याने त्याची तब्येत अधिकच बिघडली. शरीरावर फोड आले आणि त्याची दृष्टी गेली. उपचार पद्धतीने त्याचा आजार बरा झाला. मात्र त्याचे दोन्ही डोळे निकामी होऊन तो अंध बनला. दृष्टी परत मिळविण्यासाठी गेल्या दहा वर्षांपासून विविध ठिकाणीं त्याच्यावर उपचार करण्यात आले. परंतु यश आले नाही. जून २०१२ मध्ये कलाल याला दाखल करून घेण्यात आले. त्याच्यावर सुमारे ७ महिने उपचार करण्यात आले. दि. १४ डिसेंबर रोजी सुमारे सात तास ही शस्त्रक्रिया करण्यात आली. तीन टप्प्यात उपचार करून शस्त्रक्रिया यशस्वी झाली. यामुळे गुरुराजला सध्या चार फुटापर्यंतचे दिसत आहे. दहा वर्षांनंतर त्याला दृष्टी मिळाली आहे.

सदर शस्त्रक्रिया अवघड असून दक्षिण भारतात केवळ हैद्राबाद व चेन्नई या ठिकाणी अशी शस्त्रक्रिया करण्याची व्यवस्था असल्याचे डॉ. सिद्धार्थ यांनी सांगितले. बेळगाव येथील भरतेश हॉस्पिटल आणि वासन आय क्लिनिक येथे ही शस्त्रक्रिया करण्यात आली असून या कामी हुबळी येथील डॉ. नीलकमल हल्लूर यांची महत्त्वाची मदत मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. सिद्धार्थ पुजारी यांनी रोम (इटली) येथील सॅन कॅमिलो हॉस्पिटल येथे 'मोडीफाईड–ओस्टोओ–ओडोंटो–कॅरॅटो–प्रोस्थेसीस' या शस्त्रक्रियेचे तंत्रज्ञान आत्मसात केले आहे. तेथील डॉ. फॅलसिनेली हे या शस्त्रक्रियेतील तज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांच्याकडून आपण प्रशिक्षण घेतले असून आपला हा पहिलाच प्रयत्न असून यात यशस्वी झालो. गुरुराज याला दृष्टी परत मिळवून दिल्याने समाधान मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

**अत्यंत अवघड शस्त्रक्रिया**

आगीची दुर्घटना, स्फोटक पदार्थांमुळे दृष्टी गमावलेल्या रुग्णांना ही शस्त्रक्रिया उपयोगी ठरते.

तीन टप्प्यात शस्त्रक्रिया करावी लागते. पहिल्या टप्प्यात रुग्णाचे नेत्रपटल काढण्यात आले. त्यानंतर (ठराविक) दाढ काढून त्यामध्ये छिद्र (सुमारे ३.७ मि. मी.) करून ऑप्टिकल सिलिंडर (लेन्स) बसविण्यात आली. नंतर ती दाढ डोळ्याच्या खालील भागात बसवून त्याद्वारे दृष्टी मिळवून देण्यात आली. अत्यंत अवघड अशी ही शस्त्रक्रिया असून सध्या गुरुराजला चार फुटापर्यंतचे अंतर पाहता येत आहे. सुमारे सात महिन्यांपर्यंत उपचार करून त्यानंतर शस्त्रक्रिया करण्यात आली, अशी माहिती डॉ. सिद्धार्थ यांनी दिली.

गुरुराज कलाल व त्याच्या पत्नीने झालेल्या घटनेबद्दल माहिती दिली. डॉ. नितीन खोत, माजी नगरसेवक सुरेश पुजारी यावेळी उपस्थित होते.